# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 08 January 2026

# Time 01.00 to 01.05 PM

# Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

# प्रादेशिक बातम्या

# दिनांक ०८ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

गुजरातमधल्या वेरावळ इथल्या प्राचीन सोमनाथ शिवमंदिराच्या गौरवासाठी वर्षभर चालणाऱ्या सोमनाथ स्वाभिमान पर्वाचा आजपासून प्रारंभ होत आहे. तत्त्वांशी तडजोड न करता उच्च सांस्कृतिक मूल्यांच्या रक्षणासाठी झटलेल्या भारतमातेच्या असंख्य सुपुत्रांचं स्मरण करण्यासाठी हे पर्व साजरं केलं जात असल्याची भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमांवर व्यक्त केली आहे. जानेवारी १०२६ मध्ये, म्हणजेच एक हजार वर्षांपूर्वी सोमनाथ मंदिरावर पहिलं परकीय आक्रमण झालं, अनेक आक्रमणांनंतरही भारताची शाश्वत श्रद्धा डगमगली नाही, उलट या घटनांनी भारताच्या सांस्कृतिक एकात्मतेला अधिक बळ मिळालं आणि सोमनाथ मंदिराचा वारंवार जीर्णोद्धार होत राहिला, असं पंतप्रधानांनी सांगितलं. यावेळी त्यांनी सोमनाथ मंदिराला दिलेल्या आपल्या पूर्वीच्या भेटींची छायाचित्रं प्रसिद्ध करत, नागरिकांनीही सोमनाथ स्वाभिमान पर्व या हॅशटॅगसह छायाचित्रं शेअर करण्याचं आवाहन केलं.

****

केंद्र सरकारनं कीटकनाशक व्यवस्थापन विधेयक, २०२५ वर संबंधित लोकांकडून, सूचना आणि हरकती मागवल्या आहेत. हे विधेयक कीटकनाशकांशी संबंधित, जुन्या दोन कायद्यांची जागा घेईल. विधेयकाचा मसुदा सरकारनं प्रसिद्ध केला आहे. शेतकऱ्यांना, दर्जेदार कीटकनाशकं उपलब्ध व्हावीत, तसंच कीटकनाशकांशी संबंधित किरकोळ गुन्हे फौजदारी कलमांमधून वगळणं असा हा विधेयकाचा हेतू आहे. संबंधितांना चार फेब्रुवारी पर्यंत आपल्या सूचना पाठवायच्या आहेत.

****

परीक्षा पे चर्चा २०२६ या कार्यक्रमाने स्वतःचाच गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मोडला असल्याची माहिती, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिली. यंदा या कार्यक्रमासाठी चार कोटींपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन सहभाग नोंदवला आहे. मागच्या वर्षी या कार्यक्रमात सुमारे साडे तीन कोटीपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी करुन, जागतिक विक्रम केला होता.

****

ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांचं आज पुण्यात दीर्घ आजाराने निधन झालं, ते ८३ वर्षांचे होते. पश्चिम घाटातील जैवविविधतेच्या संवर्धनासाठी त्यांनी दिलेलं योगदान अतुलनीय आहे. पश्चिम घाटाच्या संरक्षणासाठी त्यांनी तयार केलेला ‘गाडगीळ अहवाल’ पर्यावरण संवर्धनासाठी एक महत्त्वपूर्ण आणि दूरदर्शी दस्तऐवज ठरला. पर्यावरण क्षेत्रातील उत्तुंग कार्याबद्दल संयुक्त राष्ट्रांनी २०२४ मध्ये गाडगीळ यांना, ‘चॅम्पियन्स ऑफ द अर्थ’ या सर्वोच्च सन्मानाने गौरवलं होतं.

गाडगीळ हे भारतातील जैवविविधतेच्या कायद्याचे शिल्पकार होते, असं सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. तर गाडगीळ यांच्या निधनामुळे पर्यावरण संरक्षण चळवळीची मोठी हानी झाल्याची भावना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली.

****

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर गँट्री म्हणजेच धातूच्या मोठ्या चौकटी उभारण्याचं काम सुरु होणार आहे. या तांत्रिक कामासाठी पाच दिवस वाहतुकीत बदल करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. उद्यापासून ते १३ तारखेपर्यंत अमरावती जिल्ह्यातल्या धामणगाव – चांदुर – नांदगाव खंडेश्वर या मार्गावरील वाहतूक काही वेळेस तात्पुरती थांबवली जाऊ शकते, त्यामुळे प्रवाशांनी प्रवासाचं नियोजन योग्य प्रकारे करावं आणि महामार्ग कर्मचाऱ्यांच्या सूचनांचं पालन करावं, असं आवाहन करण्यात आलं आहे.

****

राष्ट्रीय रस्ते सुरक्षा अभियान २०२६ आणि महाराष्ट्र पोलिस विभागाच्या वर्धापन दिनानिमित्त, परभणी पोलिस दलाच्या शहर वाहतूक शाखेच्यावतीने आज शहरात हेल्मेट मोटारसायकल रॅली काढण्यात आली. राजगोपालचारी उद्यानापासून सुरु झालेल्या या रॅलीचा पोलीस अधीक्षक कार्यालयात समारोप झाला. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्यासह पोलिस अधिकारी, अंमलदार तसंच नागरिकांनी हेल्मेट परिधान करून या रॅलीत सहभाग नोंदवला. या उपक्रमातून रस्ते सुरक्षा आणि हेल्मेट वापराचं महत्त्व नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात आलं.

****

मलेशियात सुरू असलेल्या मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत लक्ष्य सेन आणि आयुष शेट्टी यांच्या दुसर्या फेरीतल्या पराभवामुळे भारताचं या स्पर्धेतलं पुरुष एकेरीतलं आव्हान संपुष्टात आलं आहे. आज झालेल्या सामन्यांमध्ये लक्ष्यचा हाँगकाँगच्या खेळाडुकडून, तर आयुषचा चीनच्या खेळाडुकडून पराभव झाला. महिला एकेरीत पी व्ही सिंधुचा दुसर्या फेरीतला सामना जपानच्या मियाझाकी शी होणार असून, पुरुष दुहेरीत सात्विकसाईराज–चिराग शेट्टी या जोडीचा सामना मलेशियाच्या जोडीविरुद्ध होणार आहे.

****

इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियादरम्यानची नामांकित पाच सामन्यांची ॲशेस क्रिकेट कसोटी मालिका ऑस्ट्रेलियानं चार – एक अशी जिंकली.

****